आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ ऑगस्ट २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सत्तेबाहेर जायच्या भितीनं अटकेनंतर महिनाभरात राजीनामा द्यावा लागेल, या घटनादुरुस्तीला विरोधकांकडून विरोध होत असल्याची प्रधानमंत्र्यांची टीका

- भटक्या कुत्र्यांचं लसीकरण आणि नसबंदीसंदर्भात धोरण निर्धारित करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश

- राज्यात विविध ठिकाणी आज पोळ्याचा सण साजरा

**आणि**

- ऑरिक सिटी अंतर्गत आणखी उद्योगांना भूखंड वाटप

**<><><><><>**

प्रधानमंत्र्यांपासून ते मुख्यमंत्र्यांसहित कोणत्याही मंत्र्याला अटक झाल्यास जर ३० दिवसांच्या आत त्याला जामीन मिळाला नाही तर ३१व्या दिवशी त्याला राजीनामा द्यावा लागेल असा कायदा केंद्र सरकार आणू पाहत आहे. सत्तेबाहेर जावे लागेल या भितीनं सर्व विरोधी पक्ष याला विरोध करत आहेत, अशी टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केली. बिहारच्या गयाजी इथं आज ते एका जाहीर सभेत बोलत होते.

प्रधानमंत्री आज बिहार आणि पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर आहेत. बिहारमध्ये गयाजी इथं १३ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. यामध्ये उर्जा, रस्ते, आरोग्य, गृहनिर्माण, शहरी विकास आणि पाणीपुरवठा अशा विविध विकास योजनांचा समावेश आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजनेच्या काही लाभार्थ्यांना प्रातिनिधिक रूपात घरांच्या चाव्या देण्यात आल्या. राज्यातल्या रोजगारनिर्मितीसाठी केलेल्या

प्रयत्नांबद्दल त्यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचं कौतुक केलं. बिहारच्या विकासासाठी केंद्र सरकारनं केलेल्या साहाय्याबद्दल मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी प्रधानमंत्र्यांना धन्यवाद दिले.

बिहार इथला दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री पश्चिम बंगालमध्ये कोलकाता इथं कार्यकर्ता मेळाव्याला संबोधित करतील. तसंच नव्याने बांधलेल्या मेट्रो रेल्वेला हिरवा झेंडा दाखवतील आणि ५ हजार २०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील.

**<><><><><>**

राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना भटक्या कुत्र्यांसंबंधीचं धोरण तयार करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आहेत. अशा प्रकरणांशी संबंधित ज्या याचिका देशभरातल्या विविध उच्च न्यायालयात प्रलंबित असतील, त्या सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित करण्याचे आदेशही देण्यात आले.

दिल्ली एनसीआर परिसरातले रेबीजची लागण झालेले आणि आक्रमक वृत्तीच्या कुत्र्यांना वगळता उर्वरित भटक्या कुत्र्यांना नसबंदी आणि लसीकरण करून त्यांच्या पूर्वीच्या परिसरात सोडण्यात यावं, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन. व्ही अंजारिया यांच्या पीठानं हे निर्देश दिले आहेत.नवीन निर्देशानुसार, भटक्या कुत्र्यांना खाऊ घालण्याला मनाई करण्यात आली असून त्यांच्यासाठी खाण्याच्या जागा निश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे.

भटक्या कुत्र्यांना हटवण्याच्या कामात अडथळा आणणाऱ्या संघटना किंवा गटावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे, असंही सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आपल्या समाजाचा ५० टक्के भाग असलेल्या महिला जेव्हा विकासाच्या प्रवासाचा एक भाग होतील, तेव्हाच विकसित भारताचं स्वप्न साकार होईल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोगानं आयोजित केलेल्या शक्तिसंवाद या कार्यक्रमाचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचा रस्ता लिंग समतेतूनच जातो, असं सांगून केंद्र आणि राज्य सरकारने महिलांसाठी राबवलेल्या विविध योजनांचा उल्लेख त्यांनी केला. महिलांचा सन्मान फक्त पुस्तकातून शिकवून चालणार नाही, तर आपल्या वागणुकीतून घरातल्या लहान मुलांना ते शिकवायला हवं, यावर त्यांनी भर दिला.

<><><><><>

राज्य सरकार सुमारे १ हजार ८०० भजनी मंडळांना भजन साहित्याच्या खरेदीसाठी २५ हजार रुपये अनुदान देणार आहे. गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्यानिमित्त आयोजित विविध उपक्रमांचा भाग म्हणून ही मदत दिली जाणार आहे. यासाठी उद्यापासून ०६ सप्टेंबर पर्यंत mahaanudan.org या वेबसाइटवर अर्ज करावे लागतील.

<><><><><>

जड मालवाहतूक करणाऱ्या वाहनांना क्लीनरची गरज नाही अशी अधिसूचना राज्य सरकारनं प्रसिद्ध केली आहे. मालवाहतूकदारांच्या संघटनेनं केलेल्या मागणीनुसार ही अधिसूचना सरकारनं जारी केली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने वाहन निर्मिती होत असल्यानं क्लिनरची गरज नाही. परिणामी खर्च कमी होईल, असा वाहतूकदारांचा दावा आहे. यावर परिवहन आयुक्त कार्यालयात २९ ऑगस्टपर्यंत हरकती दाखल करता येतील.

<><><><><>

राज्यभरात आज बैलपोळ्याचा सण साजरा होत आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो. बैलांना अंघोळ घालून, शिंगाला रंग लावून आकर्षक सजावट करून गावातून त्यांची वाजत गाजत मिरवणूक काढली जाते. पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. **भंडारा** जिल्ह्यात डोकेसरांडी इथं बैलाचं काम करणाऱ्या ट्रॅक्टरसाठी आधुनिक पद्धतीने पोळ्याच आयोजन केलं जात आहे. गेल्या काही वर्षांपासून या उपक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून हा अनोखा सोहळा गावाच्या एकतेचे प्रतीक ठरत आहे. **परभणी**मध्येही मोठ्या उत्साहात बैलपोळ्याच आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

नाशिक महानगरपालिका तसंच गोदावरी इनिशिएटीव्ह स्वयंसेवी संस्थेच्या यांच्या संयुक्त विद्यमानं राबवण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत नाशिक शहरातल्या १२० शाळांमधल्या विद्यार्थ्यांनी काल १६ हजारांहून अधिक शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनवण्याचा अनोखा विक्रम केला. या विक्रमाची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगरातल्या शेंद्रा बिडकीन औद्योगिक क्षेत्रात अर्थात ऑरिक सिटीत अनेक कंपन्यांना औद्योगिक भूखंड देण्यात आले आहेत. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने एका पत्रकात ही माहिती दिली आहे. या कंपन्यांमध्ये खाद्यान्न, कागद, इलेक्ट्रॉनिक्स, रस्ते बांधणी उपकरणे, इत्यादी उद्योगांचा समावेश आहे. यामध्ये २०० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून सुमारे १ हजार रोजगारनिर्मिती होण्याचा अंदाज आहे. छतंत्रपती संभाजी नगरमधल्या या ऑरिक सिटी ची निर्मिती दिल्ली मुंबई औद्योगिक मार्गिकेच्या अंतर्गत होत आहे. या प्रकल्पाच्या योजनेसाठी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी नुकतीच या

क्षेत्राला भेट दिली होती. महाराष्ट्र औद्योगिक शहरे लिमिटेड तर्फे विकसित होणाऱ्या या ऑरिक सिटीमुळे गुंतवणुकीला चालना मिळेल, व्यवसायसुलभता वाढीस लागेल आणि एक खिडकी परवाना सुविधेला प्रोत्साहन मिळेल.

<><><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये काल ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ काल संमत झालं. याविषयी सामान्यांमधून प्रतिक्रिया येत आहेत. अहिल्यानगर इथल्या बाबासाहेब वाकळे यांनी प्रतिक्रिया दिली…

**होल्ड बाईट - बाबासाहेब वाकळे**

तर धुळ्याचे विनायक चव्हाण या विधेयकाविषयी म्हणाले…

**होल्ड बाईट - विनायक चव्हाण**

<><><><><>

चढ्या दरानं खतांची विक्री करून शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या गोंदिया जिल्ह्यातल्या ३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले असून ६ कृषी केंद्राचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. गोंदिया जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाच्या वतीनं तैनात करण्यात आलेल्या भरारी पथकानं तपासाअंती ही कारवाई केली आहे. फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधावा असं आवाहन जिल्हा कृषी अधिक्षकांनी केलं आहे.

<><><><><>

वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन च्या वतीने खासगी साखर उद्योगातल्या उल्लेखनीय कार्याबद्दल धाराशिव जिल्ह्यात साईनगर रांजणी इथल्या नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज या कारखान्याला ‘राज्यातील सर्वोत्कृष्ट कारखाना’ हा पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण काल सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पुण्यात करण्यात आलं.

**//<><><><><>//**